संपूर्ण माणदेशात एकाचवेळी प्रसिध्द होणारे एकमेव दैनिक

mandeshexpressatp@gmail.com

दैनिक

माणदेशी बुलंद आवाज...

# माणदेश एक्सप्रेस

संपादक : दिपक गौतम प्रक्षाळे

मोबा. ९५९५०४७६७६/९५०३६३८६८६

www.mandeshexpress.com



एम एन जाधव (सर) हॉस्पिटल यांचे

श्राव्या डायग्नोस्टिक्स

डिजिटल एक्स-रे सोनोग्राफी सेंटर,आटपाडी

डॉ.सौ. चैताली सप्तेश जाधव (M.B.B.S. D.M.R.E.)

डॉ. सप्तेश मधुकर जाधव (M.B.B.S.M.S. D.N.B. F.M..S.)

उपलब्ध सुविधा

* सर्व प्रकारचे डिजिटल एक्स-रे * गरोदर मातांची सोनोग्राफी 4 D स्कॅन व गर्भातील बाळांचे व्यंग निदान करणे * पोटाची, छातीची, थायराईड व स्तनाची अत्याधुनिक (हाय रिझोल्यूशन) स्कॅन * वंधत्वसाठीची आणि पाळीच्या समस्या बाबतच्या सोनोग्राफी * इंटरव्हेशनल सोनोग्राफी * सोनोग्राफीद्वारे गाठीचा तुकडा तपासणे, छातीतील किंवा पोटातील पाणी. पु काढणे. तसेच लिव्हर मधील गाठीचा (Abcess) सोनोग्राफीद्वारे उपचार

पत्ता : ग्रामीण रुग्णालयासमोर, आटपाडी

● वर्ष : ७ वे ● ● अंक : ४९ वा ● ● गुरुवार दि. १७ ऑगस्ट २०२३ ● ● किंमत २ रु ● पाने : ४ ● RNI : MAHMAR/2017/77021 Postl Reg : SGL/143/2023-2025

# जिल्ह्याच्या सर्वंकष विकासासाठी वचनबद्ध

## पालकमंत्री डॉ. सुरेश खाडे : स्वातंत्र्य दिनाचा ७६ वा वर्धापन दिन उत्साहात संपन्न

**माणदेश एक्सप्रेस न्युज**

**नवी दिल्ली :** विकास प्रक्रियेत मागे राहिलेल्या वंचित, मागास बांधवांना सगळ्यांबरोबर संधी मिळावी, तसेच जिल्ह्याचा सर्वंकष विकास व्हावा, यासाठी वचनबद्ध आहे. यासाठी सन २०२३-२४ या आर्थिक वर्षासाठी जिल्हा नियोजन आराखड्यातून विकासकामांसाठी ४०५ कोटींची तरतूद केली असून या माध्यमातून जिल्ह्याच्या चौफेर विकासासाठी प्रयत्नशील आहोत, अशी ग्वाही कामगार मंत्री तथा जिल्ह्याचे पालकमंत्री डॉ. सुरेश खाडे यांनी आज येथे दिली.

भारतीय स्वातंत्र्याच्या ७६ व्या वर्धापन दिनानिमित्त जिल्हाधिकारी कार्यालयाच्या प्रांगणात पालकमंत्री डॉ. सुरेश खाडे यांच्या हस्ते ध्वजारोहण करण्यात आले. या मुख्य शासकीय ध्वजारोहण कार्यक्रमानंतर दिलेल्या शुभेच्छा संदेशात त्यांनी ही ग्वाही दिली. यावेळी महापौर दिग्विजय



**सांगली : येथे जिल्हाधिकारी कार्यालयात स्वातंत्र्य दिनाचा ७६ वा वर्धापन दिन निमित्त स्वातंत्र्य सैनिकांचा सत्कार करताना पालकमंत्री डॉ. सुरेश खाडे, जिल्हाधिकारी डॉ. राजा दयानिधी व उपस्थित मान्यवर**

सुर्यवंशी, खासदार संजय पाटील, आमदार सुधीर गाडगीळ, पद्मश्री विजयकुमार शहा, जिल्हाधिकारी डॉ. राजा दयानिधी, जिल्हा परिषद पोलीस अधिक्षक डॉ. बसवराज तेली, मुख्य कार्यकारी अधिकारी तृप्ती धोडमिसे, महानगरपालिका आयुक्त सुनील पवार, सहाय्यक जिल्हाधिकारी अमित रंजन, अपर जिल्हाधिकारी डॉ. स्वाती देशमुख-पाटील, प्रभारी निवासी उपजिल्हाधिकारी आशिष बारकुल यांच्यासह विविध कार्यालय प्रमुख, स्वातंत्र्य सैनिक, वीरमाता, वीरपत्नी, नागरिक उपस्थित होते.

भारतीय स्वातंत्र्याच्या उपस्थितांना शुभेच्छा देऊन पालकमंत्री डॉ. सुरेश खाडे म्हणाले, शेतकरी, कष्टकरी या महत्त्वाच्या घटकासाठी राज्य शासनाने अनेक योजना सुरू केल्या आहेत. मुख्यमंत्री सौर कृषि वाहिनी योजनेसाठी जिल्ह्यात २८ ठिकाणी ७४९ एकर जागा महाराष्ट्र राज्य वीज वितरण कंपनीस उपलब्ध करून दिली आहे. या योजनेतून शेतीपंपांना दिवसा अखंडित व शाश्वत वीज मिळेल, असा विश्वास त्यांनी व्यक्त केला.

पालकमंत्री डॉ. खाडे म्हणाले, प्रधानमंत्री सूक्ष्म अन्न प्रक्रिया उद्योग योजनेतून ४३६ प्रस्तावांना कर्ज मंजुरी देण्यात आली आहे. द्राक्षे, डाळिंब व भाजीपाला पिकांच्या निर्यातीसाठी जिल्ह्यातून १२ हजाराहून अधिक लाभार्थींची नोंदणी झाली आहे. तर १७ हजार मेट्रीक टन द्राक्ष पिकाची निर्यात झाली आहे. प्रधानमंत्री कृषि सिंचन योजनेतून पावणेपाच हजार लाभार्थींना १३ कोटीहून अधिक अनुदान वितरीत केले आहे.

पान नं. २ वर

# शेटफळेत ब्रम्हानंद पडळकर यांच्या हस्ते रस्ते कामाचा शुभारंभ

**माणदेश एक्सप्रेस न्युज**

**आटपाडी/प्रतिनिधी :** शेटफळे येथे आमदार गोपीचंद पडळकर यांचे विकास निधीतून मंजूर झालेल्या शेटफळे ते शिवेचा मळा डांबरीकरण करणे या कामाचा भूमिपूजन व उद्घाटन सोहळा सांगली जिल्हा परिषदेचे माजी समाजकल्याण सभापती ब्रह्मानंद पडळकर यांच्या उपस्थितीत पार पडला.



**शेटफळे : येथे रस्ता कामाच्या भूमिपूजन प्रसंगी ब्रम्हानंद पडळकर यांचा सत्कार करताना निलेश गायकवाड व उपस्थित मान्यवर**

यावेळी हरिभाऊ गायकवाड, युवा नेते जयवंत सरगर, युवा नेते अनिल पाटील, विष्णुपंत अर्जुन, विलास काळेबाग, भाजप तालुकाध्यक्ष उमाजी सरगर, बांधकाम विभागचे श्री. देवांग, प्रणव गुरव, मी चेअरमन राजेंद्र गायकवाड, आनंदराव गायकवाड, समाधान गायकवाड, मयूर गायकवाड, अनिल चव्हाण, निलेश गायकवाड, श्रीमंत शिंदे, विपुल गायकवाड, प्रदिप क्षीरसागर, शिवाजी गायकवाड, हरिराम नरळे, दत्तात्रय कुंभार, अनिल सुर्यवंशी, अनिरूध्द देशमुख, ओमकार दुबोले यांच्यासह शेटफळे येथील ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# मी रस्ता बोलतोय

किती हे खाच खळगे आहेत. सगळेच रस्ते खड्ड्याने भरले आहेत. या रस्त्याने यायला नको. असे एका नागरिकाचे वाक्य कानी पडले मला अतिशय दुःख झाले. आज माझ्या अंगावर ठिकठिकाणी खड्डे पडले आहेत.



वाहतुकीचा खोळंबा होत आहे. अपघाताचे प्रमाण वाढले आहे. पण तुम्ही सर्वजण मलाच जबाबदार ठरवतात, तेव्हा मला फार वाईट वाटते.

पण मित्रांनो माझं वळण कुठे नागमोडी तर कुठे सरळ असते. गेल्या अनेक वर्षापासून मी तुमचा सोबती आहे. सुरुवातीला कच्च्या रस्त्याच्या अवस्थेत मी होतो. कालांतराने डांबरे रस्त्याचे रूप घेऊन मी हजर झालो. मनुष्याच्या परिस्थितीत सुधारणा झाली. दळणवळणाचे साधनेने उपलब्ध झाली. घरी दारी गाड्या आल्या. शाळेचा पहिला दिवस लहान मुले आईच्या बोटाला धरून जायचे. त्यावेळी लहान मुलांचे बोबडे बोलणे लोभस्वरूप पाहून मला आनंदाची उखळी फुटायचे हे मी सारे पाहत होतो.

त्यात माझे अरुंद पायवाट असल्याने हजारो नागरिक माझा वापर करत आहेत. खरंतर मी आज नरक यातना भोगत आहे. दिवसभरात माझ्यावरून अनेक प्रकारचे दुचाकी अवजड वाहने धावू लागले आहेत. त्यामुळे माझ्या अंगावर खड्डे पडले आहेत. मला प्रचंड त्रास होत आहे. त्यामुळे माझ्या पायवाट वरून कोणी येत नसल्याने वर्दळ कमी झाली असून कायम सोबत असणारे माझे व्यापारी मित्रांचा व्यवसाय मंदावला आहे.

माझ्या साक्षीने अनेक ठिकाणी होणारा पाणीपुरवठा लिकेज होत असल्याने त्यातून येणारे पावसाचे पाणी खड्ड्यात साचले की लोकांच्या अंगावर शिंतोडे उडू लागली की वादावादी होते, माझ्या मनाला यातना होतात, या सर्व घटनेला जबाबदार कोण? माझ्या पाय वाटेने कधी मोर्चे, आंदोलन, पदयात्रा, नेत्यांच्या भेटीगाठी, राजकीय दौरा या सर्वांचे माझ्याकडे दुर्लक्ष झाले. जरा माझ्या या खराब झालेल्या अवस्थेतील लक्ष द्या. इतकी दुरावस्था माझी कधी झाली नव्हती. मला माहित आहे, निवडणुका होणार आहेत. माझा वापर करणाऱ्या राजकर्त्यांनी आता तरी लक्ष द्या, ही कळकळीची विनंती करतो!

**बिपीन देशपांडे, आटपाडी**
**मोबू ७५८८६२८५८७**

# आटपाडीतील जलतरणपट्टू जय लवटेचा शिक्षक समिती कडून गौरव

**माणदेश एक्सप्रेस न्युज**

**आटपाडी :** आटपाडी येथील युवा नेते अशोक लवटे यांचे सुपुत्र जय लवटे याने जिल्हा, राज्य व राष्ट्रीय स्तरावर जलतरण स्पर्धेमध्ये आटपाडी तालुक्याचा नावलौकिक वाढविण्याची कामगिरी केल्याबद्दल आटपाडी शिक्षक समितीच्या वतीने शिक्षक बँकेचे माजी चेअरमन यु.टी. जाधव यांच्या हस्ते यथोचित गौरव करण्यात येवून त्याला भावी राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय कारकिर्दीस शुभेच्छा देण्यात आल्या वॉटर पोलोत महाराष्ट्र तर्फे चेन्नई येथे झालेल्या स्विमिंग स्पर्धेत जय हा दुसरा क्रमांकावर आला. तसेच राष्ट्रीय स्पर्धेत त्याला रौप्य पदक मिळवण्याची कामगिरी केली असून विविध स्पर्धात दमदार कामगिरी करत आहे. शिवाय तो सध्या पुणे बालेवाडी येथील क्रीडा संकुलात बालाजी केंद्रे यांच्या मार्गदर्शनाखाली सराव करीत आहे.



**आटपाडी : येथे जय लवटे याचा सत्कार करताना शिक्षक बँकेचे माजी चेअरमन यु.टी. जाधव व उपस्थित मान्यवर**

यावेळी आरपीआय जिल्हाध्यक्ष राजेंद्र खरात, शिक्षक समिती माजी तालुका अध्यक्ष शामराव एवळे, दिपक कुंभार, प्रविण बाड, काकासाहेब पाटील, रणजीत एवळे, अशोक लवटे, सिद्धेश्वर लवटे, पांडुरंग हातेकर आदी मान्यवर उपस्थित होते.

# आनंदराव नवले यांचा सत्कार



**सांगली : विना अपघात पंचवीस वर्ष सेवा केल्याबद्दल विभागीय नियंत्रक यांच्या हस्ते सत्कार स्विकारताना चालक आनंदराव नवले**

**माणदेश एक्सप्रेस न्युज**

**आटपाडी :** आटपाडी आगारामध्ये चालक म्हणून कार्यरत असणारे आनंदराव राघाप्पा नवले यांनी आपल्या पंचवीस वर्षाच्या सेवेमध्ये विना अपघात विरहीत सेवा दिल्या बद्दल त्यांचा १५ ऑगस्ट रोजी सांगली येथे विभागीय नियंत्रक यांच्या हस्ते सत्कार करण्यात आला. तसेच त्यांना सन्मानचिन्ह, सन्मानपत्र व पंचवीस हजार रुपयांचा धनादेश प्रदान करण्यात आला.

कमी पगार, रस्त्यावरील मुजोर वाहनचालकांची अरेरावी तसेच मारहाणीच्या काही घटना यांमुळे मनोधैर्य खचलेल्या एसटी चालकांमध्ये आत्मविश्वास निर्माण करण्यासाठी एसटी महामंडळ सलग २५ वर्षे विना-अपघात सेवा देणाऱ्या एसटी चालकांचा सत्कार करते.

सलग २५ वर्षे विना-अपघात सुरक्षित सेवा बजावणाऱ्या चालकांना रोख रक्कम, शाल, श्रीफळ, २५ वर्षे सुरक्षिततेचा बिल्ला व चालकाच्या पत्नीस साडी-चोळी देऊन समारंभपूर्वक गौरविण्यात येते. आटपाडी आगारामधून हा गौरव आनंदराव नवले यांना मिळाल्याने विभागीय नियंत्रक यांच्या सत्कार करून त्यांना गौरविण्यात आले. त्यांणा मिळालेल्या या यशाबद्दल त्यांचे समाजातील सर्व स्तरातून अभिनंदन होत आहे.

भाऊ कन्स्ट्रक्शन

बिल्डर्स & डेव्हलपर्स

9004792356

- उत्कृष्ट,दर्जेदार आणि मजबूत पध्दतीचे कामे.
- सर्वांच्या पसंतीत आणि विश्वासात नं.१ चे स्थान असलेले.

# चौंडेश्वरी पतसंस्थेत सादिक खाटीक यांच्या हस्ते ध्वजारोहण

**माणदेश एक्सप्रेस न्युज**

**आटपाडी :** येथील चौंडेश्वरी ग्रामीण बिगर शेती सहकारी पतसंस्था येथे ७७ व्या स्वातंत्र्य दिनाच्या निमित्ताने सादिक खाटीक यांच्या हस्ते ध्वजारोहण करण्यात आले.

याप्रसंगी चौंडेश्वरी पतसंस्थेचे कुटुंबप्रमुख चंद्रकात दौंडे, चेअरमन राहुल सपाटे, व्हा.चेअरमन योगेश रणदिवे, विणकर सोसायटीचे व्हा.चेअरमन भास्कर चोथे, चौंडेश्वरी पतसंस्थेचे माजी चेअरमन राजेंद्र दौंडे, माजी व्हा. चेअरमन उत्तम कवडे, सामाजीक कार्यकर्ते विकास देशमुख, रमेश टकले, पतसंस्थेचे संचालक सर्वश्री संजय डोईफोडे, अजित कलढोणे, सोनराज ऐवळे, विकी दिवटे, मच्छिंद्र खंडागळे, सुरज हजारे, विणकर सोसायटीचे संचालक अनिल भागवत, सोमनाथ दौंडे, सुरेश डोईफोडे, पांडुरंग ढोबळे, सामाजीक कार्यकर्ते संतोष डोंबे, बाळासाहेब कवडे, विशाल कवडे, नितीन डांगे, विजय तावरे, सुधीर लाटणे, आदित्य सपाटे,



**आटपाडी : येथील चौंडेश्वरी पतसंस्थेत ध्वजारोहण प्रसंगी उपस्थित सादिक खाटिक, राहुल सपाटे, योगेश रणदिवे, बालक डोईफोडे व उपस्थित मान्यवर**

श्रीनिवास सपाटे, पतसंस्थेचे सचिव बालक डोईफोडे, कर्मचारी तानाजी जाधव, संजय तारळेकर, अक्षय दौंडे, संतोष सपाटे, रोशनी खंदारे, चंद्रकांत पोळ, नितीन सागर, सुशांत फासे यांच्यासह अनेक मान्यवरांच्या उपस्थितीत हा ध्वजारोहणाचा सोहळा संपन्न झाला.

यावेळी बोलताना सादिक खाटिक म्हणाले, भिन्न धर्मीय, भिन्न जातीय, रावापासून रंकापर्यत सर्वांनाच एकमेकांच्या गटाचे रक्त चालत असल्याने इतर मानवी भेदाच्या श्रृंखला आपोआप गळून पडतात.

माणुसकीच्या नात्याने आपण सर्व जण एकमेकांचे बांधव आहोत. या बंधुत्वाच्या भारतीयत्वाच्या भावनेने चौंडेश्वरी पतसंस्थेच्या परिवारातील सर्वांनी मला ध्वजारोहनाची संधी दिली, हा माझ्या जीवनातला सर्वोच्च बहुमान असून, आटपाडी नगरपंचायतीचे मुख्याधिकारी इचलकरंजीकर पवन म्हेत्रे हे देवांग कोष्टी समाजाचे आहेत. भविष्यात आटपाडीचा होणारा पहिला नगराध्यक्ष ही या समाजाचा झाल्यास, सर्वत्र लक्षवेधी काम करणाऱ्या देवांग कोष्टी समाजाचा खरा गौरव होईल असे म्हणाले.

स्वागत, प्रास्ताविक चौंडेश्वरी पतसंस्था आणि विणकर सोसायटीचे मार्गदर्शक चंद्रकांत दौंडे यांनी, चौंडेश्वरी पतसंस्था, विणकर सोसायटी, देवांग कोष्टी समाज संघटना, इतर सामाजीक सेवाभावी मित्रांच्या सहकार्याने या परिवारातील सर्व संस्थानी आज अखेर समाजाभिमुख दैदिप्यमान वाटचाल केली आहे. समाजातील सर्व स्तरातील कर्तृत्वसंपन्न व्यक्तीमत्वांच्या हस्ते ध्वजारोहण करून देशाच्या राष्ट्रध्वजाचा यथोचित सन्मान व्हावा, तसेच अप्रत्यक्षरित्या ही सामान्य स्तरातील माणसेही गौरविली जावीत, याच उदात्त भावनेने या शहरातील अनेकांच्या हस्ते ध्वजारोहन केले गेले असल्याचे स्पष्ट केले.

# संपादकिय

## राष्ट्रवादीसाठी दोन रोहित मैदानात

राजकारणामध्ये काही काय होईल याचा नेम नाही. शहाण्या माणसाने राजकारणात येवू नये असे म्हंटले जाते ते राज्यातील घडलेल्या राजकीय घडामोडी वरून बघायला मिळत आहे. २०१९ साली भाजप-शिवसेना युतील राज्यातील मतदारांनी कौल दिला असताना सुरुवातीची अडीच वर्ष मुख्यमंत्री पदासाठी वाद निर्माण झाला. अन राज्यामध्ये महाविकास आघाडी सरकार अस्तित्वात आले.

प्रियकराची प्रेयसी त्याला सोडून गेल्यावर जेवढे दु:ख त्याला होते, त्यापेक्षाही जादा दु:ख भारतीय जनता पक्षाच्या नेत्यांना हातातील सत्ता गेल्यावर आले. त्यामुळे जसा मासा पाण्याविना जगू शकत नाही तसेच सत्तेची गुंगी आलेल्या भाजपने मग डाव टाकायला सुरुवात केली अन पहिला बदला घेतला तो, शिवसेनेचा. शिवसेनेमध्ये फुट पाडून शिवसेने गटातील एकनाथ शिंदे यांना मुख्यमंत्री देत भाजपणे उद्धव ठाकरे यांचा बदला घेतला. दुसरीकडे सत्ता गेल्याने भाजपपेक्षा वाईट अवस्था ही राष्ट्रवादी काँग्रेसची झालेली. राष्ट्रवादीवाले जणू सत्तेसाठीच जन्माला आले आहेत असा त्यांचा कयास. शिंदे मुख्यमंत्री झाले अन त्यांच्या गटातील आमदारांनी ताळतंत्र सोडून बरळायला सुरुवात केल्याने भाजप पक्ष अडचणीत येवू लागल्याने अगोदर सत्तेतून बाहेर फेकले गेलेल्या अजित पवारांनी राष्ट्रवादीमध्ये फुट पाडत भाजपशी जुळवून घेत सत्तेत सहभागी झाले.

राष्ट्रवादीमध्ये फुट पडल्याने शरद पवारांनी पुन्हा मैदानात उतरत सभा गाजवायला सुरु केली असली तरी, वयोमानाप्रमाणे त्यांना अडचण येत असली तरी १७ ऑगस्टला शरद पवारांची बीडमध्ये जाहीर सभा होणार आहे. राष्ट्रवादीत फूट पडल्यानंतर पवारांनी येवल्यात पहिली सभा घेतली होती. आता दुसरी सभा पवार बीडमध्ये घेत आहेत. राष्ट्रमध्ये अजितदादा स्टार प्र्चाराकी भूमिका बजावत असल्याने त्यांची पोकळी भरून काढण्यासाठी दोन रोहित हे शरद पवारांसाठी मैदानात उतरले आहेत. आमदार रोहित पवार आणि आर. आर. पाटलांचे पुत्र रोहित पाटील सज्ज झाले आहेत. नुकताच रोहित पवार आणि रोहित पाटील यांनी मराठवाड्याचा दौरा करत संघटन मजबूत करण्यावर भर दिला आहे.

एकीकडे राष्ट्रवादीचे आमदार खासदार, कार्यकर्ते अजित पवारांसोबत गेलेले असताना हे दोन रोहित शरद पवारांसोबत खंबीर उभे राहिले आहेत.

पावसाळी अधिवेशनात एमआयडीसीचा तसेच एमपीएससीच्या परीक्षांचा मुद्दा मांडून रोहित पवारांनी तरुणांना आपल्या बाजूने करण्याचा प्रयत्न केला. त्याचबरोबर रोहित पाटलांच्या मागे देखील मोठा तरुण वर्ग आहे. आता येत्या काळाच पवारांचा विचार तरुणांपर्यंत पोहचवण्यासाठी हे दोन्ही रोहित महाराष्ट्र पिंजून काढणार आहेत. त्यामुळे येत्या काळात हे दोन्ही रोहित काय करिष्मा करतात हे पाहणं महत्त्वाचं असणार आहे.




# जिल्ह्याच्या सर्वंकष विकासासाठी वचनबद्ध

**पान नं १ वरुन :** जिल्ह्यात ७५ अमृत सरोवरांचे काम पूर्ण झाले असून जिल्ह्याच्या दृष्टीने ही अभिमानास्पद व गौरवाची बाब आहे. या अमृत सरोवरांच्या ठिकाणी मेरी माटी मेरा देश या उपक्रमातून वृक्षारोपण करण्यात येत आहे, असे सांगून पालकमंत्री डॉ. खाडे म्हणाले, जिल्ह्याच्या पूर्व भागातील विशेषत: जत तालुक्यातील दुष्काळी गावांना पाणी देण्यासाठी १९३० कोटी पैकी १०२८ कोटी रूपयांच्या म्हैसाळ विस्तारीत योजनेच्या कामाचा कार्यारंभ आदेश देण्यात आला असून लवकरच हे काम सुरू होत आहे. यामुळे जत तालुक्यातील ६५ गावांचा सिंचनाच्या पाण्याचा प्रश्न कायमस्वरूपी मिटेल. असे ते म्हणाले.

ध्वजारोहण समारंभानंतर पालकमंत्री डॉ. सुरेश खाडे यांच्याहस्ते स्वातंत्र्य सैनिक सर्वश्री माधवराव माने, महादेव रंगनाथ दंडगे, भिमराव अण्णा गोडसे, सज्जनराव शामराव पाटील, ज्ञानू येसु सावंत, नबिलाल अमिन मुलाणी यांचा सत्कार करण्यात आला. सैन्य सेवेत जम्मू काश्मिर येथे सीमा नियंत्रण रेषेवर कार्यरत असताना केलेल्या साहसी पराक्रमासाठी हवालदार संदीप विश्वास जाधव (निवृत्त), लान्स नायक किसन बाबुराव आटुगडे (निवृत्त) यांचा ताम्रपट व सानुग्रह अनुदान देवून सन्मान करण्यात आला. याच पराक्रमासाठी शिपाई योगेश नागेश किर्ते यांचा सन्मान त्यांच्या कुटुबियांनी स्वीकारला. गुणवत्तापूर्ण सेवेसाठी राष्ट्रपती पदक जाहीर झाल्याबद्दल फायरमन कासाप्पा लक्ष्मण माने यांचा गौरव करण्यात आला.

गुंतागुंतीच्या न्युरोसर्जरी यशस्वीपणे पार पाडल्याबद्दल डॉ. संतोष भिमराव दळवी व डॉ. अभिनंदन पाटील, राष्ट्रीय बाल स्वास्थ कार्यक्रमात उकृष्ट कामगिरीबद्दल राष्ट्रीय बाल स्वास्थ कार्यक्रमाचे जिल्हा कार्यक्रम समन्वयक डॉ. प्रमोद चौधरी, वैद्यकीय अधिकारी डॉ. संदीप साळी, बालहृदयरोग तज्ज्ञ डॉ. प्रिया प्रधान, महात्मा ज्योतिराव फुले व प्रधानमंत्री जनआरोग्य योजनेमध्ये उल्लेखनीय कामगिरीबद्दल शासकीय वैद्यकीय महाविद्यालय मिरज, सुदर्शन आय हॉस्पिटल सांगली यांचा सन्मान करण्यात आला.

यशस्वी लघुउद्योजक म्हणून मे. युनिव्हर्सल पॉवर कंट्रोल सांगलीच्या पूजा विजय भगत, मे. मास इंजिनिअर्सच्या अर्चना बळीराम पवार (दास), क्षारपड जमिनीमध्ये बांबूची लागवड करून जमिनीची सुपिकता वाढविल्याबद्दल डॉ. दीपक येरटे यांचा सन्मान करण्यात आला. एक्स्ट्रा ऑर्डीनरी ग्रास्पिंग पॉवर जिनिअस किडमध्ये वर्ल्ड रेकॉर्डमध्ये नोंद झाल्याबद्दल दीड वर्षाची अर्शित राजेश शिंदे आणि शिष्यवृत्ती परिक्षेत गुणवत्ता यादीत आलेल्या २२ गुणवंत विद्यार्थ्यांचा सत्कार करण्यात आला.

ध्वजारोहणानंतर उपस्थितांनी तंबाखू मुक्तीची शपथ घेतली. सूत्रसंचालन विजय कडणे यांनी केले. कार्यक्रमास विविध मान्यवर, शासकीय अधिकारी, कर्मचारी, ज्येष्ठ नागरिक, विद्यार्थी, पत्रकार आदि उपस्थित होते.

# माणचे आमदार जलनायक नसून खलनायक : रणजितसिंह देशमुख

**माणदेश एक्सप्रेस न्युज**



रणजितसिंह देशमुख

**म्हसवड/प्रतिनिधी :** माणचे आमदार हे जलनायक नसून खलनायक असल्याची घणाघाती टीका काँग्रेसचे नेते हरणाई सहव  माणदेशी सह सूतगिरणी चे चेअरमन रणजितसिंह देशमुख यांनी सोमवारी केले. माढा लोकसभा मतदार संघातील माण, खटाव व फलटण विधानसभा मतदार संघ निहाय प्रमुख काँग्रेस कार्यकर्त्यांची बैठक आज दहिवडी येथील सिद्धनाथ मंगल कार्यालयात पार पडली. यावेळी, महाराष्ट्र प्रदेश काँग्रेस कमिटी चे उपाध्यक्ष मोहन जोशी, धवलसिंह मोहिते पाटील, रणजितसिंह देशमुख, उदयसिंह पाटील, सुरेश जाधव, राजेंद्र शेलार, बाळासाहेब माने, एम के भोसले, नकुसाताई जाधव, विश्र्वंभर बाबर, गब्बारभाई काझी यांच्या सह शेकडो प्रमुख कार्यकर्ते उपस्थित होते. यावेळी रणजितसिंह देशमुख बोलत होते.

पुढे बोलताना ते म्हणाले, माजी मुख्यमंत्री पृथ्वीराज चव्हाण यांच्या मुळे माण-खटावला जीहे कठापुर व उरमोडी चे पाणी आले आहे. ज्या पृथ्वीराज बाबांनी माण ला पाणी दिले त्यांचे नाव ही ते सभेत घेत नाहीत. जनतेसाठी आम्ही उभारत असलेल्या साखर कारखान्याला विरोध करतात, ते काँगेस चे गद्दार आहेत. अशी घणाघाती टिका आ. जयकुमार गोरे यांच्यावर नाव न घेता केली.

आम्ही दोन सूतगिरण्या उभ्या केल्या, कारखान्याचे काम ही सुरू आहे. हजारो तरुणांना काम दिले. माण च्या लोकप्रतिनिधींनी साधी पिठाची गिरणी तरी उभी केली आहे का? असा जाब जनतेने विचारण्याची वेळ आली आहे. नुसते नारळ फोडण्याचा धंदा बंद करा. खरे काय आहे ते जनतेसमोर मांडावे. माण व खटाव तालुक्यातील जनता त्रासली आहे. मुळ काँग्रेसचे असलेले कार्यकर्ते भाजप मध्ये गेले आहेत. त्यांनी पुन्हा काँग्रेस मध्ये प्रवेश करावा त्यांचे स्वागत केले जाईल. आगामी लोकसभा व विधानसभा निवडणुकीत पक्ष देईल ती जबाबदारी स्वीकारून काँग्रेस चा झेंडा फडकविण्यासाठी आम्ही सज्ज आहोत. अशी ग्वाही देशमुख यांनी यावेळी दिली.




# बक्षीस रक्कमेतून जपली सामाजिक बांधिलकी

## डीसीसी बँकेच्या माळशिरस शाखेचा उपक्रम



माळशिरस : बक्षीस म्हणून मिळालेल्या रक्कमेतून विद्यार्थ्यां यांना खावू वाटप तसेच शिक्षकांना पेन वाटप प्रसंगी डीसीसी बँकेचे अधिकारी, कर्मचारी व उपस्थित मान्यवर

**माणदेश एक्सप्रेस न्युज**

**माळशिरस/प्रतिनिधी :** सोलापूर जिल्ह्यातील शेतकऱ्यांची, व्यवसायिकांची, सर्वांची हक्काची बँक म्हणजे सोलापूर जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक. याच बँकेच्या माळशिरस शहर शाखेने आपल्याला मिळालेल्या पारितोषिकातून एक अनोखा आदर्श समोर ठेवला आहे. बक्षीस म्हणून मिळालेल्या रक्कमेतून सामाजिक बांधिलकी जपत १५ ऑगस्ट २०२३ रोजी भारतीय स्वातंत्र्याच्या अमृतमहोत्सवानिमित्त माळशिरस व परिसरातील शाळा व विद्यालयातील ५००० मुलांना खाऊ व शिक्षकांना पेन भेटवस्तू वाटप करण्यात आली. सोलापूर जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेचे माजी प्रशासक शैलेश कोतमिरे यांच्या संकल्पनेतून व बँकेचे विद्यमान प्रशासक कुंदन भोळे, मुख्य कार्यकारी अधिकारी विलास देसाई, व्यवस्थापक तथा पालक अधिकारी रावसाहेब जाधव यांचे मार्गदर्शनानुसार चालू असलेल्या व्यवसाय विकास आराखडा  २०२३ अंतर्गत जिल्ह्यात शहरी विभागातून प्रथम क्रमांक मिळवून माळशिरस शहर शाखेने मिळालेल्या बक्षीस रकमेमधून सामाजिक बांधिलकी जपत ५००० मुलांना खाऊ व शिक्षकांना पेन भेटवस्तू वाटप करण्यात आले.

यावेळी माळशिरस तालुका सिनियर बँक इन्स्पेक्टर यू. एम. दिक्षीत, बँकेच्या सेवक सहकारी पतसंस्थेचे संचालक एम.एस.गायकवाड, बँक इन्स्पेक्टर एच.एम.मुलाणी, शाखाधिकारी यू.एस.भोसले, संगणक प्रतिनिधी एस.के.चौगुले, क्लार्क पी.एल.गायकवाड, एस.जे.धाईंजे, कु.डी.एन.पांढरे, शिपाई एस.व्ही.चव्हाण, भाऊसाहेब जगताप आदी मान्यवर यावेळी उपस्थित होते.

# रोहित'जी, 'कृषिहित' मधून कोणाचे 'स्वहित'?

## शेतकरी हिताच्या नावाखाली कोणाची घरे भरायची आहेत? : कृषी प्रदर्शन म्हणजे पैसे कमवायचा धंदा बनवलाय का?

**माणदेश एक्सप्रेस न्युज**

**तासगाव :** जगाचा पोशिंदा असणाऱ्या शेतकऱ्याला न लुटणारा आळशी झालाय, असे म्हटल्यास वावगे ठरू नये. समाजातील प्रत्येक घटक कोणत्या ना कोणत्या मार्गाने बळीराजाचे शोषण करीतच असतो. त्यात आता महाराष्ट्राचे माजी उपमुख्यमंत्री तथा गृहमंत्री स्व. आर. आर. पाटील यांच्या जयंतीनिमित्त आयोजित 'कृषिहित' या कृषी प्रदर्शनाची भर पडत आहे. या प्रदर्शनात शेतकऱ्यांकडून सक्तीने प्रवेश फी वसूल केली जाणार आहे. प्रवेश फी दिल्याशिवाय प्रदर्शन पहायला सोडले जाणार नाही. त्यामुळे भावी आमदार म्हणून मिरवणाऱ्या रोहित पाटील यांना या प्रदर्शनातून नेमके कोणाचे हीत साधायचे आहे, कोणाची घरे भरायची आहेत, कृषी प्रदर्शन म्हणजे पैसे कमवायचा धंदा बनलाय का, असे अनेक सवाल साप्ताहिक जनतांडवचे संपादक अमोल पाटील यांनी उपस्थित केला आहे.

कृषी प्रदर्शनं म्हणजे आता पैसे कमवायचा धंदा बनला आहे, हे लपून राहिलेलं नाही. राज्यात अनेक ठिकाणी अशी प्रदर्शनं आयोजित केली जातात. शेतकरी हिताच्या नावाखाली स्टॉल धारक, औषध कंपन्या व इतरांकडून लूट केली जाते. मात्र ज्या स्व. आर. आर. पाटील यांनी हयातभर शेतकरी हीत, बळीराजा समृद्ध झाला पाहिजे, अशा गप्पा मारल्या त्यांच्याच जयंतीनिमित्त आयोजित कृषिहित या प्रदर्शनात शेतकऱ्यांना प्रवेश फी सक्तीची केली आहे. प्रवेश फी ची पावती फाडल्याशिवाय बळीराजाला प्रदर्शनात एन्ट्री दिली जाणार नाही.

स्व. आर. आर. पाटील यांचे चिरंजीव रोहित पाटील हे एकीकडे कृषिहित, शेतकरी समृद्ध झाला पाहिजे. त्याला नवनवीन तंत्रज्ञान आत्मसात करता आले पाहिजे, अशा गप्पा मारत आहेत. मात्र दुसरीकडे त्याच शेतकऱ्यावर प्रवेश फी लादून त्याची लूट केली जाणार आहे. प्रवेश फी चा मुद्दा समाज माध्यमांवर गाजला आहे. रोहित पाटील यांच्यावर शेतकऱ्यांच्या प्रवेश फी च्या मुद्द्यावरून सडकून टीका होत आहे. मात्र तरीही निगरगट्टपणे ते प्रवेश फी रद्द करायला तयार नाहीत. कदाचित शेतकऱ्यांच्या लुटीत त्यांना समाधान वाटत असावे.

तासगावात स्वाभिमानी शेतकरी संघटनेच्या वतीने गेल्या अनेक वर्षांपासून 'शिवार' हे कृषी प्रदर्शन आयोजित केले जाते. या प्रदर्शनात कोणालाही कसलीही प्रवेश फी आकारली जात नाही. सर्वांना मोफत प्रवेश दिला जातो. या प्रदर्शनात लाखो शेतकरी भेट देतात. जर महेश खराडे यांच्यासारखा फाटका कार्यकर्ता शेतकऱ्यांसाठी मोफत कृषी प्रदर्शन आयोजित करत असेल भावी आमदार म्हणून मिरवणाऱ्या रोहित पाटलांना ते का शक्य नाही, असा सवाल बळीराजा विचारत आहे. शिवाय रोहित पाटील यांचे शेतकरी हीत फक्त भाषणापुरते मर्यादित आहे का, असाही प्रश्न विचारला जात आहे.

> **आज आर. आर. पाटील हवे होते : शेतकऱ्यांच्या भावना**
>
> स्व. आर. आर. पाटील यांची शेतकऱ्यांशी नाळ होती. बळीराजाच्या सुख - दु:खात ते सहभागी होत होते. मात्र त्यांच्या वारसांचे शेतकरी प्रेम बेगडी व दिखाऊ असल्याचे दिसून येत आहे. एकीकडे शेतकऱ्यांसाठी मी हे केलं, मी ते केलं, असे छाती काढून सांगायचे आणि दुसरीकडे कृषी प्रदर्शनात शेतकऱ्यांकडून प्रवेश फी वसूल करायची, असला दुटप्पीपणा सुरू आहे. आज जर आर. आर. पाटील हयात असते तर त्यांनी कदापि शेतकऱ्यांकडून प्रवेश फी घेतली नसती, अशी भावना बळीराजा व्यक्त करत आहे.

शेतकऱ्यांना कृषी प्रदर्शनाच्या माध्यमातून नवनवीन काहीतरी द्यायचे सोडून प्रवेश फी जमा करण्यावर रोहित पाटील यांचा डोळा आहे, अशी टीका होऊ लागली आहे. तासगावात ५ दिवस चालणाऱ्या प्रदर्शनात दररोज २० हजार प्रमाणे १ लाख शेतकरी भेट देतील, अशी अपेक्षा आहे. या १ लाख शेतकऱ्यांकडून प्रवेश फी च्या माध्यमातून १० लाख रुपये 'वसूल' केले जाणार आहेत.

एकीकडे प्रवेश फी वरून समाज माध्यमांवर तिखट प्रतिक्रिया येत आहेत. तर दुसरीकडे रोहित पाटील यांचे बगलबच्चे आणि अंधभक्त प्रवेश फी चे समर्थन करीत आहेत. फुकटची किंमत कोणालाच नसते. थोडी प्रवेश फी घेतली तर बिघडते कुठे, असे अकलेचे तारे तोडले जात आहेत. एकप्रकारे शेतकऱ्यांना फुकटे म्हणण्याचा हा प्रयत्न आहे.

बगलबच्च्यांच्या अशा प्रतिक्रिया रोहित पाटील यांच्या अडचणीत वाढ करण्यास पुरेशा आहेत.त्यामुळे रोहित पाटील यांनी हे प्रदर्शन शेतकऱ्यांसाठी खुले करावे. कोणाकडूनही प्रवेश फी घेऊ नये. प्रवेश फी सारख्या किरकोळ गोष्टीत स्वत:ची बदनामी करून घेऊ नये, अशी अपेक्षा व्यक्त होत आहे.

दैनिक माणदेश एक्सप्रेस हे पत्रक श्री. शशिकांत बापूसाहेब कुंभोजकर यांनी प्रकाशक, मालक श्री. दीपक गौतम प्रक्षाळे यांच्यासाठी कुंभोजकर ऑफसेट प्रिंटर्स, २६२, महावीरनगर, सांगली. पीन ४१६४१६ महाराष्ट्र येथे छापून विठ्ठलनगर, आटपाडी, ता. आटपाडी, जि. सांगली पिन- ४१५३०१ महाराष्ट्र येथून प्रसिद्ध केले. या अंकात प्रसिद्ध होणाऱ्या बातम्या, लेख, जाहिराती इ. विषयी संपादक, मुद्रक, प्रकाशक, मालक सहमत असतीलच असे नाही. RNI Reg.No- MAHMAR/2017/77021 (आटपाडी न्यायकक्षेत)

दैनिक माणदेशी बुलंद आवाज...
# माणदेश एक्सप्रेस






## तलाठी भरती परीक्षा केंद्राच्या ठिकाणी कलम १४४ लागू

**माणदेश एक्सप्रेस न्युज**

**सांगली :** सांगली जिल्ह्यात दि. १७ ऑगस्ट २०२३ ते दि. १४ सप्टेंबर २०२३ या कालावधीत महसूल विभागातील गट-क संवर्गातील तलाठी भरती परीक्षा सन-२०२३ जिल्ह्यातील पाच केंद्रावर सकाळी ६ ते सायंकाळी ७.३० या वेळेत घेण्यात येणार आहे. परीक्षा केंद्राच्या ठिकाणी शांतता व सुव्यवस्था राखण्याच्या दृष्टीने जिल्हादंडाधिकारी डॉ. राजा दयानिधी यांनी परीक्षा केंद्राच्या ठिकाणी इमारतीपासून १०० मीटर सभोवतालच्या परिसरात परीक्षेच्या दिवशी परीक्षेच्या वेळेत फौजदारी प्रक्रिया संहिता १९७३ चे कलम १४४ लागू केले असून पुढील कृत्यांना मनाई केली आहे.

परीक्षा वेळेत परीक्षेसंबंधी अधिकारी / कर्मचारी व परीक्षेस येणारे विद्यार्थी तसेच त्यांचे लेखनिक वगळता इतर कोणत्याही चार किंवा त्यापेक्षा जास्त व्यक्तींना परीक्षा केंद्राच्या ठिकाणी फिरण्यास मनाई केली आहे. एकत्रित गटागटाने फिरणे व उभा राहण्यास मनाई केली आहे. परीक्षा वेळेत परीक्षा केंद्राच्या परिसरातील झेरॉक्स मशिन, पब्लिक टेलिफोन बुथ, फॅक्स मशीन, ध्वनीक्षेपक यांचा परीक्षा संदर्भात कोणत्याही गैरप्रकारासाठी वापरण्यास मनाई केली आहे. परीक्षा केंद्रात विद्यार्थी तसेच त्यांचे लेखनिक यांना मोबाईल, पेजर नेण्यास मनाई केली आहे. हा आदेश कायदेशीर कर्तव्य बजावित असलेल्या शासकीय कर्मचाऱ्यांना व धार्मिक विधी यांना लागू राहणार नाही.

परीक्षा केंद्रनिहाय परीक्षेचा दिनांक पुढीलप्रमाणे. पद्मभूषण वसंतरावदादा पाटील इन्स्टिट्यूट ऑफ टेक्नोलॉजी सांगली-तासगाव रोड, बुधगाव सांगली - १९ ते २० ऑगस्ट २०२३, २६ ते २७ ऑगस्ट २०२३ व दि. १० सप्टेंबर २०२३. वसंतदादा पाटील इन्स्टिट्यूट ऑफ मॅनेजमेंट स्टडीज न्ड रिसर्च, भारती विद्यापीठ जवळ सांगली-मिरज रोड वान्लेसवाडी सांगली - १७ ते २२ ऑगस्ट २०२३, २६ ते २७ ऑगस्ट २०२३, ३१ ऑगस्ट २०२३ ते १ सप्टेंबर २०२३, ४ ते ६ सप्टेंबर २०२३, ८ सप्टेंबर २०२३, १० सप्टेंबर २०२३, १३ ते १४ सप्टेंबर २०२३. आदर्श इंस्टीट्युट ऑफ टेक्नॉलॉजी न्ड रिसर्च सेंटर विटा खंबाळे भा., एमआयडीसी विटा जवळ ता. खानापूर, नानासाहेब महाडिक कॉलेज ऑफ इंजिनियरिंग पेठ गट नं. ८९४/२६६५ पुणे बेंगलोर एनएच-४ हायवे, मु.पो. पेठ नाका, ता. वाळवा व टेकवेअर टेक्नॉलॉजी विठ्ठल पाटील पॉलीटेक्निक इनामधामनी सांगली या परीक्षा केंद्रावर दि. १७ ते २२ ऑगस्ट २०२३, २६ ते २९ ऑगस्ट २०२३, ३१ ऑगस्ट २०२३, १ सप्टेंबर २०२३, ४ ते ६ सप्टेंबर २०२३, ८ सप्टेंबर २०२३, १० सप्टेंबर २०२३, १३ सप्टेंबर २०२३ व १४ सप्टेंबर २०२३ या तारखेस सकाळी ६ ते सायंकाळी ७.३० या वेळेत परीक्षा होणार आहे.

## केंद्रस्तरीय लोकनृत्य स्पर्धेत बोलवाड शाळा प्रथम

**माणदेश एक्सप्रेस न्युज**


**बेडग :** जिल्हा परिषद सांगली शिक्षण विभागाकडून पहिली ते आठवी इयत्तेतील जिल्हा परिषद शाळेतील विद्यार्थ्यांच्या केंद्रस्तरीय विविध स्पर्धा सुरू असून बेडग केंद्रातील शाळांच्या केंद्रस्तरीय लोकनृत्य स्पर्धा जिल्हा परिषद शाळा बेडग नंबर १ येथे नुकत्याच संपन्न झाल्या. या लोकनृत्य स्पर्धेत जिल्हा परिषद शाळा बोलवाड या शाळेचा पहिली ते पाचवी या लहान गटात प्रथम क्रमांक आला तर सहावी ते आठवी या मोठ्या गटात द्वितीय क्रमांक प्राप्त झाला.



**बोलवाड : बेडग केंद्रामध्ये लोकनृत्य स्पर्धेत प्रथम क्रमांक आलेले जिल्हा परिषद शाळा बोलवाड या शाळेचे विद्यार्थी व शिक्षक वर्ग**

बेडग केंद्रांतर्गत असणाऱ्या जिल्हा परिषद शाळांनी या स्पर्धेमध्ये विविध प्रकारच्या रंगभूषा व वेशभूषा करून लोकनृत्याचे मोठ्या दिमाखात सादरीकरण केले. यामध्ये जिल्हा परिषद शाळा बोलवाडच्या विद्यार्थ्यांनी पहिली ते पाचवी या लहान गटांमध्ये सादर केलेल्या वाघ्या मुरळी लोकनृत्याचा प्रथम क्रमांक आला तर सहावी ते आठवी गटात सादर केलेल्या कोळी लोकनृत्याचा द्वितीय क्रमांक आला. प्रथम क्रमांक आलेल्या लहान गटाची निवड मिरज तालुकास्तरीय लोकनृत्य स्पर्धेसाठी झाली.

बोलवाड ग्रामपंचायत सरपंच, उपसरपंच व सदस्य ,शाळा व्यवस्थापन समिती अध्यक्ष ,उपाध्यक्ष व सदस्य, शाळेचे मुख्याध्यापक ,सर्व शिक्षक व पालकांकडून यशस्वी विद्यार्थ्यांचे अभिनंदन करण्यात आले व पुढील स्पर्धेसाठी शुभेच्छा ही देण्यात आल्या. शाळेतील विद्यार्थ्यांनी सादर केलेल्या लोकनृत्याचे नृत्य दिग्दर्शन शाळेतील शिक्षक अमोल माने यांनी केले. मुख्याध्यापक किशोर भंडारे, शाळा व्यवस्थापन समिती अध्यक्ष सुरेखा चव्हाण, उपाध्यक्ष शिक्षक परशराम सलगरे ,यशवंत सावंत, संतोष ढोले, सिंधू मराठे ,सविता डांगे यांच्यासह पालक व विद्यार्थ्यांचे सहकार्य लाभले.







## रिक्षाचालकाच्या प्रामाणिकपणाबद्दल पोलिसांकडून सत्कार

**माणदेश एक्सप्रेस न्युज**

**कडेपूर :** चिखली ता. कडेगांव येथील पोलिस पाटील ड. उषा वायदंडे या न्यायालयीन कामाकरीता कराड येथे गेल्या होत्या. त्यावेळी त्यांची पर्स रिक्षात विसरली होती. ज्या मध्ये बँकचे एटीएम कार्डस, डेबिट कार्ड, क्रेडीट कार्ड, रोख रक्कम, वाहनाच्या चाव्या, आधार कार्ड, पॅनकार्ड, मोबाईल, कोर्ट कागदपत्रे होते. सदरची पर्स ऑटो रिक्षा चालक आशपाक दस्तगीर मुलाणी. रा. कराड यानी पोलिसांच्या समक्ष ॲड.उषा वायदंडे याचकडे आणून प्रामाणिकपणे परत केले.

सापडलेली पर्स व तर दस्तावेज पोलिस ठाण्यात आणून प्रमाणिकपणा दाखविल्याबद्दल रिक्षाचालक अशपाक मुलाणी यांचा सत्कार वरिष्ठ पोलीस अधिकारी जितेंद्र शहाणे यांचे हस्ते प्रशस्तीपत्र



देऊन करण्यात आला. रिक्षाचालक आशपाक मुलाणी यांनी दाखवलेल्या प्रामाणिकपणाबद्दल त्यांचे सर्व स्तरातून अभिनंदन होत आहे.

### • राष्ट्रचेतना अभियानाची स्वातंत्र्यदिनी मुंबईत सांगता •

## जात-धर्मात गुंतवून लोकशाही पोखरण्याचा डाव उधळून लावा : नरेंद्र वाबळे

**माणदेश एक्सप्रेस न्युज**

**मुंबई/प्रतिनिधी :** जात-धर्माच्या अस्मिता बळकट करून लोकशाही पोखरण्याचे कारस्थान कांही धर्मांध शक्तींकडून सुरू आहे. अशा शक्तीच राष्ट्रध्वज, राष्ट्रगीत आणि स्वातंत्र्याबद्दल नकारात्मक विचार समाजात पेरत आहेत. आम्ही भारताचे लोक म्हणून घेणाऱ्या लोकशाही प्रेमी नागरिकांनी एकत्रित येऊन हे कारस्थान उधळून लावावे असे आवाहन, मुंबई मराठी पत्रकार संघाचे अध्यक्ष नरेंद्र वि. वाबळे यांनी केले. संविधान समता दिंडी आयोजित राष्ट्रचेतना अभियानाच्या सांगता सोहळ्यात अध्यक्ष पदावरून ते बोलत होते.

आपलं संविधान इतकं मजबूत आहे की इथली लोकशाही संपवण्याचे प्रयत्न कधीही यशस्वी होऊ शकणार नाहीत. आपण सगळे मिळून या संविधानाचे रक्षण करुन या देशात खंऱ्या अर्थाने लोकशाही बळकट करु, असा विश्वास त्यांनी व्यक्त केला.

राष्ट्रचेतना अभियानाची स्वातंत्र्यदिनी मुंबईत सांगता समारोप झाला. याप्रसंगी ते बोलत होते. पुढे बोलताना ते म्हणाले, देशात जे काही चालू आहे त्याचे मूळ जात-धर्म हेच आहे. जात ही समूळ गेली पाहिजे आणि त्यासाठी सत्यशोधक समाजाचे विचार पुढे आले पाहिजेत. सत्यशोधक समाजाचे विचार मागे पडले म्हणून नको त्या शक्ती पुढे आल्या. सत्यशोधक समाजाला सप्टेंबरमध्ये १५० वर्ष पूर्ण होत आहेत असे सांगून सत्यशोधक विचारांचा जोरदार जागर करुया आणि जात-धर्माच्या विळख्यातून समाजाला बाहेर काढण्याचा सर्वांनी मिळून प्रयत्न करुया असे आवाहन वाबळे यांनी उपस्थितांना केले.




**मुंबई : येथे संविधान समता दिंडी आयोजित राष्ट्रचेतना अभियानाच्या सांगता सोहळा संपन्न झाला. यावेळी विचारमंचावर उपस्थित मान्यवर**

संताचे विचार, संविधान, तिरंगा याला एखादा विकृत माणूस आव्हान देतो आणि आम्ही काहीच करु शकत नाही याची खंत माजी पोलीस आयपीएस अधिकारी सुरेश खोपडे यांनी व्यक्त केली. संताचे विचार, संविधान मागे का पडतंय याची कारणं शोधून त्यावर इलाज करायला हवा. शिक्षणपध्दती व संगोपन पध्दती कालबाह्य झाली आहे तिला पर्याय दिला पाहिजे, ज्यात संविधान शिक्षण देता आलं पाहिजे. ही व्यवस्था बदलायची तर कोणी? आत्ता नाहीतर कधी? असा सवाल त्यांनी केला. हे वातावरण बदलण्यासाठी मी इथे आलोय. तुमच्या सगळ्यांच्या सोबत मी आहे असे आश्वासन खोपडे यांनी याप्रसंगी दिले.

दादामहाराज पनवेलकर यांनी या अभियानातले अनुभव कथन केले व या अभियानाच्या पुढच्या टप्प्यात आपले पूर्णतः योगदान राहिल असे जाहिर केले. मुंबई येथील वसंतदादा अभियांत्रीकी महाविद्यालयाचे कार्यकारणी सदस्य रमेश देशमुख यांनी या राष्ट्रचेतना अभियानात सामिल सर्वांचे आभार मानले आणि अजूनही आशेचा किरण आहे असे सकारात्मक भाष्य केले. या अभियानातील पत्रकारांच्या भूमिकेचेही त्यांनी स्वागत केले.

निवृत्त पोलिस अधिकारी आणि जेष्ठ कवी रमेश आव्हाड यांनी हा कार्यक्रम हा समतेचा वटवृक्ष महाराष्ट्रभर रुजवणारा आहे असे सांगून त्यांनी आपल्या आसपासचा अंधार वाढत चालला तर गळ्यापर्यंत येईल हे लक्षात ठेवले पाहिजे असा इशारा देत आपल्या कवितांतून परखड मांडणी केली.

भारतीय संविधान, राष्ट्रध्वज, राष्ट्रगीत आणि राष्ट्रीय प्रतिकांचा इतिहास आणि महत्त्व समाजात रुजविण्यासाठी विवेकी वारकरी संघटनांनी पंढरपूर येथून सुरू केलेल्या संविधान समता दिंडी आयोजित राष्ट्र चेतना अभियानाचा सांगता सोहळा मंगळवार, दिनांक १५ ऑगस्ट २०२३ रोजी मुंबईत संपन्न झाला. मुंबई मराठी पत्रकार संघात आयोजित या सांगता सोहळ्याचे अध्यक्षस्थान मुंबई मराठी पत्रकार संघाचे अध्यक्ष नरेंद्र वाबळे यांनी भूषविले. विचारमंचावर यावेळी माजी पोलिस आयुक्त सुरेश खोपडे, शरद कदम, दादा महाराज पनवेलकर, ज्येष्ठ कवी रमेश आव्हाड, भारत महाराज घोगरे गुरुजी, सिरत सातपुते, रमेश देशमुख उपस्थित होते.

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन शामसुंदर सोन्नर महाराज यांनी केले.

कार्यक्रमाचे प्रास्ताविक ह.भ.प. भरत महाराज घोगरे गुरुजी यांनी केले. राष्ट्र चेतना अभियनाची संकल्पना त्यांनी प्रास्ताविकेत स्पष्ट केली.

पंढरपूर येथील कैकाडी महाराज मठाचे मठाधिपती ह.भ.प. भारत महाराज जाधव, देवराम महाराज कोठारे, धर्मकिर्ती महाराज परभणीकर, समाधान महाराज देशमुख, दादा महाराज पनवेलकर, मधुकर महाराज बारुळकर, ज्ञानेश्वर महाराज बंडगर आदी वेगवेगळ्या वारकरी संस्था, फड, संघटनांच्या प्रमुखांनी यात सहभाग घेतला. या अभियानाची सुरुवात पंढरपूर येथून १ ऑगस्ट रोजी जगदुरु तुकाराम महाराज यांचे वंशज बापूसाहेब देहूकर, दिंडीकरी, फडकरी समाजाचे माजी अध्यक्ष ज्ञानेश्वर महाराज जळगावकर यांच्या उपस्थितीत झाली. १ ऑगस्ट ते १५ ऑगस्ट महाराष्ट्राच्या गावा गावात हे अभियान सुरू होते. कीर्तन, प्रवचन, व्याख्यान या माध्यमातून लोक जागृती करण्यात आली. संपूर्ण महाराष्ट्रात ४६ ठिकाणी या अभियाना अंतर्गत कार्यक्रम करण्यात आले अशी माहितीही घोगरे गुरुजींनी दिली. हा कार्यक्रम म्हणजे १ ते १५ ऑगस्ट दरम्यानच्या अभियानाचा सांगता सोहळा असला तरी ही सुरवातच आहे आणि हे अभियान आपल्याला पुढे घेऊन जायचे आहे याची उपस्थितांना त्यांनी जाणीव करुन दिली. या अभियानाच्या निमित्ताने वेगवेगळ्या पुरोगामी चळवळींना एकत्रीत बांधले जावे अशी आशा त्यांनी व्यक्त केली.

### ज्येष्ठ स्वातंत्र्य सैनिक पारिख यांचे आशिर्वाद!

संविधान समता दिंडी आयोजित राष्ट्रचेतना अभियानाला ज्येष्ठ स्वातंत्र्य सैनिक जि. जि. पारिख यांनी आशिर्वाद दिले. या अभियानानाच्या सांगता सोहळ्याचे निमंत्रण देण्यासाठी संविधान समता दिंडीचे संचालक ह.भ.प. शामसुंदर महाराज सोन्नर आणि शरद कदम यांनी त्यांची भेट घेतली. तेव्हा मी आता शंभरीच्या उंबरठ्यावर उभा आहे. शरीर साथ देत नाही. खूप वेदना होतात, असे त्यांनी सांगितले. यावेळी शरद कदम यांनी शामसुदर महाराज सोन्नर यांच्या संविधान जागृती, शेतकरी आत्महत्या रोखण्यासाठी केले प्रयत्न इत्यादि कामांची माहिती दिली. तेव्हा या कामा पुढे माझ्या वेदना खूप कमी वाटतात. मी येण्याचा प्रयत्न करतो. त्यातून शक्य झाले नाहीच तर माझे आशिर्वाद तुमच्या सोबत आहेत, असे पारिख यांनी सांगितले.

# शिक्षणाबरोबरच विद्यार्थ्यांच्या कला गुणांना वाव मिळाला पाहिजे : बजरंग विरकर

**माणदेश एक्सप्रेस न्युज**
**म्हसवड/अहमद मुल्ला :** शिक्षणाबरोबरच विद्यार्थ्यांच्या कला गुणांना वाव देऊन मुलांच्या अंगी शिस्त निर्माण करून भारताची भावी पिढी, आदर्श, सक्षम व कलागुणसंपन्न बनविण्याचे आवाहन माजी सैनिक बजरंग विरकर यांनी स्वातंत्र्य दिन कार्यक्रम प्रसंगी विरकरवाडी येथे केले.
जिल्हा परिषद आदर्श शाळा विरकरवाडी येथे भारतीय स्वातंत्र्य दिनाच्या अमृत महोत्सव समारोप कार्यक्रमात ध्वजारोहण, राज्यगीत गायन, ध्वजगीत यासह देशभक्ती पर गीतावर मुलांनी सुंदर नृत्य सादर केले. इंग्लिश, मराठी, हिंदीत मुलांची भाषणे झाली. लेझीम चे उत्कृष्ट सादरीकरण केले. यावेळी स्वातंत्र्य सैनिक शिवाजी जावीर, बजरंग विरकर यांनी मनोगत व्यक्त केले. निपुण भारत अंतर्गत सर्वांना शपथ घेतली.
यावेळी डॉ.प्रमोद गावडे, विलास खरात, अशोक विरकर, शेखर विरकर, डॉ.रुपेश वाघमारे, विशाल विरकर या सदस्यांनी सर्व मुलांना स्पोर्ट किटचे वाटप केले. प्रा विठ्ठल सजगाणे यांच्या वतीने मुलांना स्कुल बॅग देण्यात आली. शाळा व्यवस्थापन समिती उपाध्यक्ष नितीन लोखंडे यांनी वृक्ष देऊन वृक्षारोपण करण्यात आले.


म्हसवड : येथील वीरकरवाडी जि.प. शाळेमध्ये ध्वजारोहण प्रसंगी उपस्थित मान्यवर

प्रा. विठ्ठल सजगाने यांनी आदर्श शाळेतील विविध उपक्रमाचे कौतुक केले. माता पालक गटाच्या ग्रुप लीडर जयमाला विरकर, अश्विनी शिंदे, वर्षा बनगर यांनी पालकांना मार्गदर्शन केले. मुख्याध्यापक सुशील त्रिगुणे यांनी प्रास्ताविक व स्वागत त्र सूत्रसंचालन पल्लवी जगताप यांनी केले.
कार्यक्रमसाठी माजी नगरसेविका मनीषा विरकर, माजी नगरसेवक आप्पा विरकर, माजी केंद्रप्रमुख जगन्नाथ विरकर, नामदेव विरकर, उत्तम बनगर, बाळराजे विरकर, शाळा व्यवस्थापन समिती अध्यक्ष समीनदर विरकर, लक्ष्मी विरकर, सुप्रिया चव्हाण, अनिता तोरणे, पूनम शेंडे, डॉ बापूराव विरकर उपस्थित होते. आभार कांतीलाल खाडे यांनी मानले.

# नव उद्योजक व सुशिक्षित बेरोजगारांसाठी आज मार्गदर्शन मेळावा

**माणदेश एक्सप्रेस न्युज**
**सांगली :** जिल्हा उद्योग केंद्र, खादी ग्राम उद्योग मंडळ व महाराष्ट्र उद्योजकता विकास केंद्र (एम. सी. ई. डी.) उद्योग भवन सांगली यांच्या वतीने बुधवार, १६ ऑगस्ट २०२३ रोजी सकाळी ११:३० वाजता उद्योजकता मार्गदर्शन व मुख्यमंत्री रोजगार निर्मिती कार्यक्रम (सीएमईजीपी) प्रस्ताव रजिस्ट्रेशन मार्गदर्शन मेळावा उद्योग भवन विश्रामबाग सांगली येथे आयोजित करण्यात आला आहे. जिल्ह्यातील नवउद्योजक बेरोजगार युवक, युवतींनी मेळाव्यास उपस्थित राहून मार्गदर्शन घ्यावे व स्वतःचा उद्योग व्यवसाय सुरू करावा, शासकीय कर्ज व अनुदान योजनांचा लाभ घ्यावा, असे आवाहन जिल्हा उद्योग केंद्राचे महाव्यवस्थापक संतोष गवळी यांनी केले आहे.
जिल्ह्यातील तरुण व होतकरू बेरोजगारासाठी स्वतःचा उद्योग सुरू करण्यासंदर्भात मेळाव्यामध्ये मार्गदर्शन करण्यात येणार आहे. नवीन व्यवसाय सुरू करू इच्छिणाऱ्या तरुण पिढीला स्वतःचा उद्योग व्यवसाय निवड करण्यासाठी अनेक अडचणी येत असतात. त्यामध्ये उद्योग संधी उद्योगाची निवड उद्योगासाठी लागणारे भांडवल शासनाच्या विविध कर्ज व अनुदान विषयक योजना, त्यासाठी लागणारे कागदपत्रे, प्रकल्प अहवाल व बँकेची भूमिका इत्यादी विषयावर मार्गदर्शन होणार आहे. उद्योजकता विकास, उद्योग संधी व उद्योगाची निवड बाबत प्रकल्प अधिकारी दत्तात्रय क्षीरसागर, महाराष्ट्र उद्योजकता विकास केंद्र, खादी ग्राम उद्योग मंडळा अंतर्गत येणारे उद्योग कर्ज योजना इत्यादी विषयावर जिल्हा खादी व ग्रामोद्योग अधिकारी श्री. तांबोळी, जिल्हा उद्योग केंद्र अंतर्गत येणारे उद्योग व शासकीय कर्ज व अनुदान विषयक योजनांची माहिती उद्योगाचे रजिस्ट्रेशन इत्यादी विषयावर जिल्हा उद्योग केंद्राचे महाव्यवस्थापक संतोष गवळी तसेच उद्योगासाठी बँकेची भूमिका या विषयावर बँक ऑफ इंडियाचे बँक अधिकारी पिराजी मीठारे हे मार्गदर्शन करणार आहेत.
कार्यक्रमात सहभागी होण्यासाठी https://forms.gle/MQ8ZnioH44sB5mpD6 या गुगल लिंकवर नाव नोंदणी करावी. मार्गदर्शन कार्यक्रम हा येथून पुढे दर बुधवारी सकाळी ११:३० वाजता असणार आहे, असे श्री. गवळी यांनी प्रसिध्दीपत्रकाव्दारे कळविले आहे.

# स्वातंत्र्यदिनानिमित्त माळीनगर येथे वृक्षारोपण

**माणदेश एक्सप्रेस न्युज**
**माळीनगर :** माळीनगर (ता. माळशिरस, जि. सोलापूर) येथे महात्मा फुले कृषी विद्यापीठ राहुरी संलग्नित रत्नाई कृषी महाविद्यालयातर्फे आयोजित करण्यात आलेल्या ग्रामीण जागरूकता कार्यानुभव कार्यक्रम २०२३-२४ अंतर्गत स्वातंत्र्यदिनानिमित्त वृक्षारोपण करण्यात आले.
यावेळी अकलूज येथील शिक्षण प्रसारक मंडळाचे अध्यक्ष संग्रामसिंह मोहिते पाटील, रत्नाई कृषी महाविद्यालयाचे प्राचार्य आर.जी. नलावडे, कार्यक्रम समन्वयक प्रा.एस.एम एकतपुरे, प्रोग्राम ऑफिसर प्रा.एम.एम. चंदनकर आणि प्रा. एच.व्ही. कल्याणी यांच्या मार्गदर्शनानुसार कृषिदूत भाग्यश्री कदम, आकांक्षा मोरे, लक्ष्मी कोरे, रोहिणी गोलेकर, अंकिता भोगवडे, प्रणाली देशमुख, मेघना मोरे, प्रशाली पवार, श्वेता भडंगे यांनी आंबा, चिंच, सिताफळ, चिकु या झाडाची वृक्षारोपण केले. यावेळी कृषीसहायक, ग्रामसेवक, कृषिदूत व माळीनगर मधील ग्रामस्थ उपस्थित होते.
कार्यक्रमात कृषिदुतांनी वृक्षरोपणाची गरज व त्याचे फायदे व वृक्षसंवर्धन कसे करावे या विषयी मार्गदर्शन केले. तसेच वृक्षरोपण करून निसर्गाचे संतुलन कसे ठेवता येईल याबद्दल माहिती दिली. याप्रसंगी झाडे लावा झाडे जगवा हा सामाजिक संदेश देण्यात आला.


माळीनगर : येथे ग्रामीण जागरूकता कार्यानुभव कार्यक्रम अंतर्गत उपस्थित कृषीदुत व मान्यवर

# यापुढे बेदाण्याचा समावेश लष्कराला पुरवठा करण्यासाठी लढाई

## महेश खराडे : धुळगाव येथे बेदाणा उत्पादक शेतकऱ्यांच्या वतीने सत्कार

**माणदेश एक्सप्रेस न्युज**
**सांगली/प्रतिनिधी :** बेदाणा उत्पादक शेतकऱ्यांना न्याय देण्यासाठी आम्ही संघर्ष करतो आहे. बेदाण्याचा शालेय पोषण आहारात समावेश करण्यात आम्ही यशस्वी झालो. त्यामुळे सुमारे ७० ते ८० लाख विद्यार्थ्यांना लाभ होणार आहे. यापुढे बेदाणा लष्कराला पुरवठा करावा यासाठी संघर्ष करू अशी ग्वाही स्वाभिमानीचे जिल्हाध्यक्ष महेश खराडे यांनी दिली.
तासगाव तालुक्यातील धूळगाव येथे बेदाण्याचा शालेय पोषण आहारात समावेश करण्यात यश मिळविल्या बद्दल महेश खराडे यांचा सत्कार धुळगाव येथील द्राक्ष उत्पादक शेतकऱ्यांच्या वतीने अनिल डूबल यांच्या हस्ते सत्कार करण्यात आला. यावेळी त्यांच्या हस्ते शालेय मुलांना बेदाणा वाटप करण्यात आले. कार्यक्रमाला सरपंच सौ.सलमा बागनीकर, तालुका अध्यक्ष दामाजी डूबल उपस्थित होते.
पुढे बोलताना महेश खराडे म्हणाले, द्राक्ष बेदाणा उत्पादक शेतकऱ्याची अवस्था वाईट झाली आहे. यंदा द्राक्षाचे दर फार गडगडले बेदाण्याचे दर ही १०० रुपये पेक्षा कमी म्हणजेच, यापेक्षा चिरमुरे महाग आहेत. आम्ही द्राक्ष बेदाणा उत्पादक शेतकऱ्यांना न्याय देण्यासाठी संघर्ष करत आहोत. यासाठी या प्रश्नावर चड्डी मोर्चा काढला. बेदाणा मोफत वाटप करून या प्रश्नाची दाहकता राज्य सरकारचया लक्षात आणून दिले. त्यामुळेच राज्याचे मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी मुंबई ला चर्चेसाठी बोलाविले. त्यावेळी त्यांनी बेदाण्याचा शालेय पोषण आहारात समावेश करण्याची ग्वाही दिली दिल्याने, त्यानुसार तो निर्णय घेतला. यामुळे ७० ते ८० लाख विद्यार्थ्यांना लाभ होणार असून अंदाजे लाख ते दोन लाख टन बेदान्याचा उठाव होणार असल्याने बेदाणा उत्पादक शेतकरी यांना आर्थिक लाभ होणार आहे.
यापुढे भारतीय लष्कराला बेदाणा पुरवठा करण्यासाठी लढाई करून त्यात यशस्वी होवू असा दावा त्यांनी केला. द्राक्ष, बेदाणा खाणे कसे हितकारक आहे हे सांगणारी जाहिरात टीव्ही वर सुरू करावी, द्राक्ष विमा योजना बारमाही राबवावी आदीसह अन्य प्रश्नासाठी ही आमची लढाई असेल असे ते म्हणाले. यावेळी मुख्याध्यापक, शिक्षक, माजी सैनिक, विद्यार्थी, ग्रामस्थ उपस्थित होते.


धुळगाव : येथे बेदाणा उत्पादक शेतकऱ्यांच्या वतीने सत्कार महेश खराडे यांचा सत्कार करताना शेतकरी

# सई ताम्हणकरच्या ड्रायव्हरला मारहाण

**माणदेश एक्सप्रेस न्युज**
**मुंबई :** प्रसिद्ध अभिनेत्री सई ताम्हणकरच्या ड्रायव्हरला मारहाण करण्यात आली आहे. सदरची घटनाही मुंबईतल्या मालवणी भागात घडली आहे. सई ताम्हणकरच्या ड्रायव्हरने दोनदा हॉर्न वाजवला. त्याचा राग मनात धरुन चार मुलांनी बांबू आणि पट्ट्याने मारहाण केली. ही मुलं झिगझॅग पद्धतीने बाईक चालवत होती. त्यामुळे सई ताम्हणकरच्या ड्रायव्हरने हॉर्न वाजवला. याचा राग मनात धरुन त्याला मारहाण करण्यात आली. सद्दाम मंडल असं सई ताम्हणकरच्या ड्रायव्हरचं नाव आहे.
१३ ऑगस्टच्या रात्री सद्दामला मारहाण करण्यात आली. सई ताम्हणकरला त्याने चिंचोली बंदर या ठिकाणी सोडलं. तिला सोडून परतत असताना ही घटना घडली. सद्दाम त्याच्या घरी परतत होता.
या प्रकरणी सद्दाम म्हणाला की, मी गाडी चालवत होतो. त्यावेळी काही जण झिगझॅग पद्धतीने बाईक चालवत होते. त्यांचा अपघातही होऊ शकत होता इतक्या वेगात ते होते. मी हॉर्न वाजवला आणि गाडी नीट चालवा असंही सुचवलं. त्यानंतर या मुलांनी त्यांच्या बाईक थांबवला आणि मला मारहाण करण्यास सुरुवात केली. या मुलांनी त्यांच्या मित्रांनाही त्या ठिकाणी बोलवून घेतलं आणि मला मारहाण केली. त्यानंतर ते तिथून पळून गेले. मालवणीतल्या काही स्थानिकांनी मला शताब्दी रुग्णालयात दाखल केलं. त्यानंतर मी या प्रकरणा पोलिसात तक्रार दिली.

स्वच्छ भारत, सुंदर भारत
स्वच्छ घर, सुंदर घर
खुषखबर! खुषखबर!! खुषखबर!!!
आम्ही आपल्यासाठी घेवून आलो आहोत...........
माणगंगा
सेफ्टीटँक ड्रेनेज क्लीनिंग सर्व्हिस
आपली संडास टाकी, शोषखड्डा, गोबर गॅस टाकी भरलेली आहे का ......... ?
चिंता करू नका......
फक्त खाली दिलेल्या मोबाईल नंबरवर फोन लावा.
आपली संडास टाकी, आधुनिक मशिनच्या सह्याने एकदम वाजवी दरात स्वच्छ करून दिली जाईल.
किरण रणदिवे
7028723789/ 9921030708
टिप :- कृपया फोन करा व जहिरात जपून ठेवा, शेजाऱ्याना उपयोगात येईल.

माणदेश एक्सप्रेस
व्यवसायिक जाहिरात योजना
आपल्या व्यवसायाचा प्रचार, प्रसार करण्यासाठी दैनिक 'माणदेश एक्सप्रेस' ने आणली आहे अल्प दरात जाहिरात योजना आहे.
आटपाडी तालुक्यासह सांगली तसेच माणदेशातील अग्रगण्य दैनिक माणदेश एक्सप्रेस च्या माध्यमातुन आपली जाहिरात ५० हजार लोकपर्यंत पोहचवा.
10 X 5 cm १०००/- रुपयात महिनाभर
10 X 10 cm २०००/- रुपयात महिनाभर
20 X 7 cm ३०००/- रुपयात महिनाभर
20 X 13 cm ४०००/- रुपयात महिनाभर
टीप : आतील पानासाठी हे दर १० टक्के कमी आहेत
याशिवाय विशेष स्किम, विविध योजांची माहिती देणाऱ्या बातम्यांना प्रसिद्धी दिली जाईल.
आजच संपर्क करा
९५९५०४७६७६, ९५०३६३८६८६

।। श्री ।।
बालाजी
इव्हेंट्स & केटरर्स
आटपाडी
प्रोप्रा-बालाजी पावले
9527696040 / 7498183475
बजेट तुमचे
नियोजन आमचे
VIP SERVICES
लग्न समारंभ | रिसेप्शन | वास्तूशांती | साखर पुडा
महाराष्ट्रीयन
गुजराती
मारवाडी
पंजाबी
साऊथ इंडियन
कॉन्ट्रॅक्ट पध्दत्तीने जेवणाच्या ऑर्डरी स्विकारल्या जातील
मालाई निवास, आटपाडी जि.सांगली